**रे.दि.मु.नं.९४/२०२२**
**नि.क्र.५४लगत**

**<u>प्रतिवादी नं. १ मुखत्यार उदय दत्ताराम नाचरे यांचा उलटतपास वादींतर्फे वकील श्री. एम.एम.शहाणे यांचेकडुन शपथेवर सुरु</u> -**

**११.** हे म्हणणे खरे नाही की माझे वडील न्यायालयात येवून साक्ष दयायला सक्षम आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्याबाबत मी न्यायालयात कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. मारुती नाचरे मयत आहेत हे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे आहे की मारुतीला विशाल, समीर व वैजयंती अशी तीन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की मारुतीची पत्नी मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की या सर्व दावा मिळकती मुळ आत्माराम नाचरे यांच्या मालकीच्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की आत्माराम यांना देवजी आणि बाळकृष्ण अशी दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की देवजीच्या पत्नीचे नाव सावित्री आहे. हे म्हणणे खरे आहे की देवजीला जर्नादन, दत्ताराम, मारुती आणि सुहासिनी अशी मुले आहेत. हे म्हणणे खरे आहे की बाळकृष्ण यांच्या पत्नीचे नाव जानकी आहे. हे म्हणणे खरे आहे की बाळकृष्ण व त्यांची पत्नी मयत आहे. हे म्हणणे खरे आहे की ते निपुत्रीक मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत अनु. १ ते १२ या वडीलोपार्जित आहेत. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे दावा मिळकतीत वादीचा १/४ हिस्सा आहे.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की जर्नादनचा पूर्वी खैर तोडीचा व्यवसाय असायचा. हे म्हणणे खरे आहे की जर्नादन यांची पिठाची चक्की देखील होती. हे म्हणणे खरे आहे की त्यांचे रेशन दुकान देखील होते. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीमध्ये स. नं. ३३/१८, ३१/३, ३३/५, ३३/१४ या मिळकती

आत्माराम नाचरे यांच्या मालकी वहिवाटीच्या असल्याबाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की त्या मिळकती देवजी नाचरे यांच्या मालकी वहिवाटीच्या असल्याबाबत कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की देवजीची पत्नी सावित्री हिच्या या मिळकती मालकी वहिवाटीच्या असल्याबाबत माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की या सर्व मिळकती सातबारा सदरी सध्या वादीच्या नावे आहेत. मी या दाव्यात वादीने हजर केलेले खरेदीपत्र पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की त्या खरेदीपत्राअन्वये या दावा मिळकती वादीने मुकुंद हरी आंबेकर यांच्याकडून खरेदी केल्याचे दिसते. माझ्या म्हणण्यानुसार वादीने एकत्र कुटुंब प्रमुख या हक्कातून दावा मिळकती विकत घेतल्या.

**१३.** मी खरेदीखत वाचलेच नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या म्हणण्यानुसार वादीने एकत्र कुटुंब प्रमुख या हक्कातून दावा मिळकती विकत घेतल्या हे कैफियतीत नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे वादीने या मिळकती एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून घेतल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की या मिळकती वादीच्या स्वकष्टार्जीत उत्तन्नातून खरेदी केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की स. नं. ३३/१४ ही मिळकत वादीला कुळकायदयाअंतर्गत मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे स.नं. ३३/१८, ३३/५, ३३/१४, ३१/०३ या मिळकतीचे वाटप होण्यास त्या पात्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की स.नं. ३३/१८,३३/५,३३/१४,३१/०३ या मिळकती वादीच्या स्वकष्टार्जित असल्याने त्या वाटपास पात्र नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी आणि माझ्या वडीलांनी या मिळकतीस वादीला वहिवाट करण्यास अडथळा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की या मिळकतीमधील किंमती झाडे मी व माझे वडील

परवानगीशिवाय तोडतो. हे म्हणणे खरे नाही की मी व माझे वडील वादीला शिवीगाळ करुन धमकी देतो. हे म्हणणे खरे नाही की दि. १५/१०/२०२२ रोजी वादीने त्याचा हिस्सा मागितला असता मी आणि माझ्या वडीलांनी त्यांना नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की मी व माझ्या वडीलांनी वादीची फावडे, कुदळ अशी शेतीची हत्यारे घेवून गेलो.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की सातबारा सदरी स.नं. ३३/१८, ३३/५, ३३/१४, ३१/०३ या मिळकतींना आमेच नाव होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादी व दत्ताराम यांच्या आईचे सोन्याचे दागदागिने वादीकडेच आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की असे सोन्याचे दागिने असल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी या कामी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की स.नं. ३३/१८, ३३/५, ३३/१४, ३१/०३ या मिळकतींचा काही भाग गडनदी प्रकल्पात गेल्याबाबत कागदोपत्री पुरावा मी दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की फेरफार नोंद २९९९ वैध आहे. हे म्हणणे खरे नाही की स.नं. ३३/१८, ३३/५, ३३/१४, ३१/०३ या मिळकतींची नुकसान भरपाईची किंमत आम्ही स्वीकारली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही प्रतिज्ञापत्रातील मजकूर खोटा आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

**सही/-**
**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**देवरुख**

**दि. ०५/०२/२०२४**